C

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]
Total No. of Printed Pages : 12 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 59 ]
Total No. of Questions : 59 ]

**CCE PR**
**NSR & NSPR**

Question Paper Serial No. **100**

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**
**Code No. : 08-M**

येथून कापा.

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
## Subject : First Language — MARATHI

**(ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. & ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**
**( Private Repeater / NSR & NSPR )**

ದಿನಾಂಕ : 28. 06. 2022 ] [ Date : 28. 06. 2022
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ–1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

### विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघूत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारचे 59 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघूत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

**Tear here**

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 10 × 1 = 10**

1. सप्तमी विभक्तीचे प्रत्यय हे आहेत —

(अ) ऊन, हून (ब) चा, ची, चे

(क) त, ई, आ (ड) स, ला, ते.

2. वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग वचनानुसार बदलते तेव्हा हा प्रयोग होतो —

(अ) कर्मणी (ब) कर्तरी

(क) भावे (ड) नवीन कर्मणी.

3. ''देवाची भक्ती करा की, फळ मिळालेच समजा'' या वाक्यात आलेला काळ

(अ) वर्तमान काळ (ब) भूतकाळ

(क) भविष्यकाळ (ड) रीती वर्तमानकाळ.

4. 'वाईट वेळ आली की बुद्धीही तशी होते' या आशयाची म्हण —

(अ) विनाशकाले विपरित बुद्धी (ब) सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही

(क) शितावरून भाताची परीक्षा (ड) गाढवाला गुळाची चव काय.

5. 'लंबोदर' हा शब्द या समासाचे उदाहरण आहे –

(अ) अव्ययीभाव (ब) तत्पुरुष

(क) द्वंद्व (ड) बहुव्रीही.

6. 'सासरी होणारा जाच' या शब्दसमुहासाठी खालीलपैकी योग्य शब्द आहे –

(अ) लेकुरवाळी (ब) माहेरवास

(क) सासुरवास (ड) यातायात.

7. 'मुलांनो' यातील 'नो' हा प्रत्यय या विभक्तीचा आहे –

(अ) संबोधन (ब) प्रथमा

(क) चतुर्थी (ड) षष्ठी.

8. 'सुनील खो-खो खेळतो' यातील प्रयोग कोणता ?

(अ) कर्तरी (ब) कर्मणी

(क) भावे (ड) समापन कर्मणी.

9. 'नवरात्र' या समासाचे उदाहरण आहे –

(अ) मध्यमपदलोपी (ब) द्विगु

(क) वैकल्पिक द्वंद्व (ड) बहुव्रीही.

10. 'अचानक होणारा मोठा बदल' या साठी योग्य शब्द हा आहे –

(अ) उत्क्रांती (ब) क्रांती

(क) साधना (ड) चमत्कार.

**II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिस-या पदाचा योग्य संबंध लिहा :**

**5 × 1 = 5**

11. कवीश्वर : स्वरसंधी : : मनोबल : ................

12. खेळतो : क्रियापद : : अबब ! : .............

13. माय : माता : : भार्या : ..................

14. गोरा : काळा : : देशप्रेमी : .......................

15. भला जन्म हा : लावणी : : अनंतशक्ती परमेश्वरू : .......................

**III. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** **8 × 1 = 8**

16. सर्वांसाठी विषयव्यवस्था कोण करतो ?

17. अनंत काणेकरांनी लिहिलेले एकमेव नाटक कोणते ?

18. गणातात्याच्या मोठ्या मुलाचे नाव काय होते ?

19. लोकसाहित्यात माहेरचा दूत या पक्षाला मानले आहे ?

20. रुक्मिणीच्या गुरुचे नाव काय होते ?

21. कवी यशवंत यांचे पूर्ण नाव काय ?

22. पृथ्वीच्या प्रेमासाठी पहाटेच्या वेळी कोण उभा आहे ?

23. 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे ?

**IV. खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा :** **3 × 2 = 6**

24. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    अ) भान हरपणे    ब) मस्तक बधीर होणे.

25. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

    चाफा बोलेना, चाफा चालेना

    चाफा खंत करी, काही केल्या फुलेना !

26. गण पाडून वृत्त ओळखा.

    आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश.

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा : 12 × 2 = 24**

27. 'अनंतशक्ती परमेश्वरू' या कथेचे तात्पर्य कोणते ?

28. 'कोप-यातील छत्री घेवू नका' असे दुकानदार लेखकांना का म्हणाला ?

29. "म्या तरी काय गुत्तं घेतलय का ?" ससंदर्भ स्पष्ट करा.

30. गंगूबाईंनी आपल्या गुरुना कोणती गुरुदक्षिणा दिली ?

31. संत ज्ञानेश्वर यांचा परिचय लिहा.

32. कृष्णाला काय आवडणार नाही ?

33. भुके जीव काय-काय करतील असे कवी म्हणतो ?

34. "ज्या अभ्यासक्रमाला 8 वर्षे लागतात तो मी 2 वर्षे 3 महिन्यात पूर्ण केला." ससंदर्भ स्पष्ट करा.

35. अनंत काणेकर यांचा परिचय तुमच्या शब्दात लिहा.

36. तात्यांनी किती एकर जमीन कशी कमवली होती ?

37. "जातील कधी हे आई ? घरदार न यांना काही." संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.

38. पृथ्वीला कशाचे भूषण वाटते ?

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3**

39. अ) वृक्षवल्ली आम्हा सोयरे

ब) एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा : 13 × 3 = 39**

40. मानकर, आंजूरकर आणि मोरे सरदारांनी काय केले ?

41. 'शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

42. लेखकाच्या घरी काकुंचे आगमन कसे झाले ?

43. चाफ्याच्या झाडाला लेखक 'बडी माँ' का म्हणतात ? त्याची गंमत कोणती ?

44. गंगुबाईंना कोणकोणते पुरस्कार आणि उपाधीनी सन्मानित करण्यात आले ?

45. 'ही बार-बार तलवार येईल का पुन्हा' म्हणजे काय ?

46. पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते लिहा.

47. समाजसेवक कोणते काम करतात असे कवी यशवंत म्हणतात ?

48. पृथ्वीचे प्रेम मिळावे यासाठी कोण-कोण कशी याचना करीत आहे ?

49. धरण कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

50. लेखकाला पाकगृहाच्या दारात उभे राहिल्यावर कोणते दृश्य दिसले ?

51. ज्ञानेश्वर कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतात ?

**किंवा**

पैल तो गे काऊ कोकताहे कवितेचा थोडक्यात सारांश लिहा.

52. हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ?

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

53. मदर्स युनियन या संस्थेची माहिती लिहा.

**किंवा**

हाऊस वाइव्हज या संस्थेची माहिती लिहा.

54. पतीच्या मृत्युनंतर टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईंना कोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

**किंवा**

सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?

55. भारत कशाप्रकारे असावा अशी संत तुकडोजींनी अपेक्षा केली आहे ?

56. पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

पहिल्या हिरव्या तृणपात्याचा ............

................................................

..................................... दारूण

................................................

................................................

............................. धरणीच्या पोटी.

**किंवा**

या इवल्या बीजाच्या ....................

...............................................

.................................... सत्कार

...............................................

...............................................

.......................अवचित हो सत्कार.

**IX. पुढे दिलेला उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

**2 × 2 = 4**

57. नुसती स्वप्ने पहात बसणे जसे वाईट आहे. तशीच आपल्या ध्येयाबद्दल एकसारखी चर्चा करणे ही वाईट असते. माझी अशी महत्त्वाकांक्षा आहे, तशी महत्त्वाकांक्षा आहे. त्यासाठी मी असा प्रयत्न करणार आहे. तशी मी योजना आखली आहे. असे ज्याला त्याला सांगत सुटण्याची सवय काही लोकांना असते. त्यामुळे त्याची शक्ती नुसती चर्चा करण्यात अधिक खर्च होते आणि प्रत्यक्ष ध्येयानुकूल कृती त्यांच्या हातून काहीच घडत नाही. बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो वर्षेल काय ही म्हण प्रसिद्धच आहे.

जो अल्पस्वल्प प्रगतीत इतिकर्तव्यता मानतो तो काही खरा महत्त्वाकांक्षी नव्हे. आळस, अज्ञान, भीती, शारीरिक दुर्बलता, मानसिक चंचलता या गोष्टींच्या आहारी जाऊन अनेक माणसे म्हणतात, जाऊ द्या माणसाने समाधानी वृत्तीने रहावे.

**प्रश्न :**

अ) कोणत्या गोष्टी वाईट आहेत ?

ब) कोण खरा महत्त्वाकांक्षी नव्हे ?

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5**

58. सांसर्गिक रोग वाढत चालल्यामुळे तुमच्या भावाला तब्येतीची काळजी घेण्यास सांगणारे पत्र लिहा.

**किंवा**

बहिणीच्या लग्नानिमित्त चार दिवस शाळेला येऊ शकणार नाही असा अर्ज वर्ग शिक्षकांना लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :** **1 × 5 = 5**

59. मोबाईल शाप की वरदान

**किंवा**

ग्रंथ हेच गुरु.